## सोस्वा ट्रेनिंग अँण्ड प्रमोशन इन्स्टिटयुट (स्टापी) पुणे

### महिला व बाल विकास विभाग महाराष्ट्र विभाग शासनद्वारा अनाथ मुलांना खुल्या प्रवर्गातून शिक्षण व नोकरी ह्यामध्ये १% समांतर आरक्षण


### महाराष्ट्र शासननिर्णय वर्षपूर्ती निमित्त आयोजित परिसंवाद

## महाराष्ट्र अलाएन्स ऑफ यंग अॅडल्ट्स प्रकल्प ''माया''

*आयोजक -सोस्वा ट्रेनिंग अँण्ड प्रमोशन इन्स्टिटयुटआणि सनाथ वेलफेअर फाउंडेशन पुणे*

*समन्वय - महिला व बाल विकास विभाग, महाराष्ट्र राज्य.*

*आर्थिक सहकार्याने - बॉम्बे कम्युनिटी पब्लिक ट्रस्ट, मुंबई.*




*स्थळ :सोस्वा ट्रेंनिग अॅण्ड प्रमोशन इन्स्टिटयुट (स्टापी), पुणे*

*बुधवार - दि.२३ जानेवारी २०१९*

STAPI

*सोस्वा ट्रेनिंग अँण्ड प्रमोशन इन्स्टिटयुट (स्टापी) पुणे आयोजक*
*म्हाडा कमर्शिअल कॉम्प्लेक्स, पहिला मजला,*
*महाराष्ट्र हौसिंग बोर्ड, येरवडा, पुणे- ४११ ००६.*
*फोन नं.: ९५-२०-२६६८७९००/२६६९ ६२१२/२६६८ २७१४/२६६८ ४६४१/*
*फॅक्स नं.: ९५-२०-२६६९ ५६४६*
**ईमेल : stapipune@gmail.com**
**वे बसाईट: www.stapi.org**





## महिला व बाल विकास विभाग महाराष्ट्र विभाग शासनद्वारा अनाथ मुलांना खुल्या प्रवर्गातून शिक्षण व नोकरी ह्यामध्ये १%समांतर आरक्षण महाराष्ट्र शासननिर्णय वर्षपूर्ती निमित्त आयोजित परिसंवादअहवाल

**बुधवार,दिनांक: दि.२३ जानेवारी २०१९**

**स्थळ :सोस्वा ट्रेनिग ॲण्ड प्रमोशन इन्स्टिटय्युट(स्टापी), पुणे**

### पार्श्वभुमी :-

*अनाथ मुलाना खुल्या प्रवर्गात १% समांतर आरक्षणाचा निर्णय महाराष्ट्र शासनाच्या महिला व बाल विकास विभागाने जानेवारी २०१८ मध्ये निर्गमीत केला.*

*सोस्वा ट्रेनिग अँण्ड प्रमोशन इन्स्टिटय्युट (स्टापी) पुणे, महाराष्ट्रात कार्यरत असलेल्या स्वयंसेवी संस्थांच्या क्षमता संवर्धन व क्षमता बांधणीचे कार्य गेली अनेक वर्ष करीत आहे. विविध प्रशिक्षण कार्यशाळांच्या माध्यमातुन स्वयंसेवी संस्थाच्या सक्षमीकरणातून अनेक प्रकल्पांची उभारणी व यशस्वी अंमलबजावणी शक्य झाली आहे.*

*अनाथ, निराधार व निराश्रीत मुलांचे सक्षमीकरण करत असताना, त्यांचा सर्वागीन विकास साधण्यात विविध स्तरावर येणाऱ्या अडचणी जाणुन घेणे व भविष्यात ह्या मुलांच्या पुर्नवसनासाठी व पुर्नस्थापनेसाठी विविध योजनांचा प्रचार, प्रसार व्हावा, ह्या व्यापक दृष्टीकोनातुन आमच्या संस्थेने, महाराष्ट्रातील २६ जिल्ह्यातील अनाथ, निराधार व निराश्रित मुलांसाठी कार्यरत शासन स्वयंसेवी संस्था संचालित बालगृहे /निरिक्षणगृहे/ पदाधिकाऱ्यांशी परिसंवाद/कार्यशाळा/ चर्चासत्र ह्या माध्यमातून संवाद साधून त्याचे प्रश्न जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे.*

*अनाथ मुलांना खुल्या प्रवर्गातून शिक्षण व नोकरी ह्यामध्ये १% समांतर आरक्षण देण्याचा निर्णयदि.१७/१/२०१८ रोजीच्याघेण्यात आला.*

*ह्या शासननिर्णयाच्या वर्षपूर्ती निमिताने अनाथ मुलांना खुल्या प्रवर्गातून १% समांतर आरक्षण देण्याबाबातची शासनाची भूमिका, शासन निर्णय अंमलबजावणीतील अडचणी व आव्हाने, खुल्या प्रवर्गातून देण्यात आलेल्या १% समांतर आरक्षणाचा लाभ अनाथ मुलांना होण्याच्या दृष्टीने काही ठोस उपाययोजना व शिफारशी तसेच अनाथ प्रमाणपत्र देण्यासंदर्भातील प्रक्रिया व निर्णय ह्या संदर्भातसोस्वा ट्रेनिंग ॲण्ड प्रमोशन इन्स्टिटय्युट(स्टापी) आणि सनाथ वेलफेअर फाउंडेशन, पुणे ह्यांच्या संयुक्त विद्यमाने व महिला व बाल विकास विभाग, महाराष्ट्र राज्य ह्यांच्या समन्वयाने व बॉम्बे कम्युनिटी पब्लिक ट्रस्ट,मुंबई ह्यांच्या आर्थिक सहकार्याने बुधवार दि.२३ जानेवारी २०१९ रोजी सोस्वा ट्रेनिंग ॲण्ड प्रमोशन इन्स्टियुट (स्टापी) येथे परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते.*

### परिसंवादात चर्चा झालेले मुद्दे :-

1. *अनाथ मुलांना खुल्या प्रवर्गातून १% समांतर आरक्षण देण्याबाबातची शासनाची भूमिका.*
2. *शासन निर्णय अंमलबजावणीतील अडचणी व आव्हाने,*
3. *खुल्या प्रवर्गातुन १% समांतर आरक्षणाचा लाभ अनाथ मुलांना होण्याच्या दृष्टीने काही ठोस उपाययोजना व शिफारशी.*
4. *अनाथ प्रमाणपत्र देण्यासंदर्भातील प्रक्रिया व निर्णय.*

**स्वागत व परिचय :-**

महिला व बाल विकास विभाग महाराष्ट्र विभाग शासनद्वारा अनाथ मुलांना खुल्या प्रवर्गातून शिक्षण व नोकरी ह्यामध्ये १%समांतर आरक्षण निर्णय वर्षपूर्ती निमित्त दि.२३ जानेवारी २०१९ सोस्वा ट्रेनिंग ॲण्ड प्रमोशन इन्स्टिटय़ूट व सनाथ वेलफेअर फाउंडेशन, आयोजित परिसंवादाचीसुरुवात निमशासकीय संस्था/शासकीय संस्था/महिला व बालकल्याण विभागातील उपस्थित शासकीय प्रतिनिधी अधिकारी ह्याच्या नावनोंदणीनेझाली.

अनाथ निराधार निराश्रित मुलांबरोबर अनेक वर्षे काम करणाऱ्या, त्यांच्या विविधांनी प्रश्नांची जाण व असलेले तज्ञ विषय साधन व्यक्ती, अनुरक्षणगृहात कार्यरत शासकीय, निम-शासकीयगृहांचे प्रतिनिधी,शासन प्रतिनिधी आणि अनाथ मुले यांनाह्या परिसंवादासाठी आमंत्रित करण्यात आले होते.

**उपस्थित प्रतिनिधीची तपशील**

| क्र | उपस्थित प्रतिनिधीची तपशील | प्रतिनिधी संख्या |
|---|---|---|
| १ | शासकीय यंत्रणेतील पदाधिकारी | ०३ |
| २ | स्वयसेवी संस्था संचालित बालगृहाचे पदाधिकारी | १० |
| ३ | शासन संचालित बालगृहांचे पदाधिकारी | ४ |
| ४ | १८ वर्षावरील बालगृहातून बाहेर पडलेले युवक/युवती | १५ |
| ५ | उपस्थित मान्यवर /बाल कल्याण समिती, तज्ञ विषय साधन व्यक्ती | १० |
| | **एकुण उपस्तिथी** | **४२** |

सर्व उपस्थित प्रतिनिधीनी आपला परिचय करुन दिल्या नंतर श्रीमती.गायत्री पाठक संचालक, सनाथ वेलफेअर फाउंडेशन, पुणे ह्यांनी ह्या संयुक्त परिसंवाद आयोजना मागील उद्देशाबाबत सर्व उपस्थितांना माहिती देताना, महिला व बाल विकास विभाग, महाराष्ट्र विभाग शासनद्वारा अनाथ मुलांना खुल्या प्रवर्गातून शिक्षण व नोकरी ह्यामध्ये १%समांतर आरक्षण निर्णय वर्षपूर्ती निमित्त वर्षभरात संदर्भातील ह्या घडामोडीचा एकत्रित आढावा घेण्याच्या दृष्टीने बुधवार दि.२३ जानेवारी २०१९ रोजीच्या परिसंवादाचेआयोजन करण्यात आले होते. श्री.प्रभाकर दि. करंदीकर भा.प्र.से. (निवृत्त) अध्यक्ष, सोस्वा ट्रेनिंग ॲण्ड प्रमोशन इन्स्टिटय़ूट (स्टापी) ह्यांनी उपस्थित मान्यवराचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

**परिसंवादास उपस्थित मान्यवर :-**

१. मा.श्री.रवी पाटिल,उपआयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य.
२. मा.दिलीप हिवराळे, विभागीय उपआयुक्त पुणे विभाग, महाराष्ट्र राज्य.
३. मा.सुधीर दळवी, जिल्हा महिला व बाल विकस आधिकरी,विभागीय उपआयुक्त कार्यालय ,पुणे विभाग, महाराष्ट्र राज्य.
४. श्री. प्रभाकर दि.करंदीकर भा.प्र.से. (निवृत्त), अध्यक्ष, सोस्वा ट्रेनिंग ॲण्ड प्रमोशन इन्स्टिटय़ूट (स्टापी).
५. श्री.नरेन्द्र पटवर्धन सदस्य,विश्वस्त सोस्वा ट्रेनिंग ॲण्ड प्रमोशन इन्स्टिटय़ूट (स्टापी).
६. डॉ. सुनिल कुमार लवटे, सल्लागार समिती सदस्य प्रकल्प माया व माजी अध्यक्ष महाराष्ट्र राज्य परिविक्षा व अनुरक्षण संघटना.
७. श्री. विष्णू बी. शेटे,सल्लागार समिती सदस्य प्रकल्प माया व सदस्य बाल कल्याण समिती,कोल्हापुर
८. श्री.सुभाषचंद्र वाघोलीकर, सल्लागार समिती सदस्य प्रकल्प माया.
९. मां.सदस्य,बाल कल्याण समिती पुणे.

## १% समांतरआरक्षणाचा लागू करण्यामागची शासनाची भूमिका:-

मा.उपआयुक्त, महिला व बाल विकास विभाग यांनी आपले मत मांडताना बाल न्याय (काळजी व संरक्षण) अधिनियम २००० या कायद्या अंतर्गत काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांच्या पुनर्वसनाची जबाबदारी ही सरकारची आहे. खुल्या प्रवर्गातून १% आरक्षणाचा फायदा ज्यांना कुणी ही पालक नाही, ज्यांना जात नाही, ज्यांचे आई वडील नाहीत अशानांच लागू होईल असे ही त्यांनी नमुद केले.

अनाथ, निराधार बालकांना पोलीस, स्वंयसेवी संस्था, पालक यांच्याकडून बाल कल्याण समिती मार्फत बालगृहात प्रवेश दिला जातो. संस्थेतील कालावधी संपल्यानंतर संस्थेच्या बाहेर पडल्यानतंर अनाथ मुलांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. अनाथ मुलांची जात नक्की माहित नसल्याने त्यांना कोणत्या एका विशिष्ट प्रवर्गात समाविष्ट करता येत नाही. जातीचा दाखला नसल्यामुळे त्यांना विविध शासकीय लाभापासून वंचित राहावे लागते, त्यामुळे त्यांच्या भावी आयुष्यात अनेक अडचणी निर्माण होतात. अनाथ मुलांकडे कोणते ही दस्तऐवज संबधित व तत्सम पुरावा नसल्यामुळे त्यांना जातीचे प्रमाणपत्र मिळत नाही व त्यामुळे अनाथ मुलांना राज्य शासनाच्या विविध शासकीय सवलतीपासून वंचित रहावे लागते. अनाथ मुलांना राज्य शासनाच्या विविध सवलतीचा लाभ घेता यावा याकरिता अनाथ मुलांना शिक्षण व नोकरी मध्ये खुल्या प्रवर्गातुन १% समांतर लागु करण्यात आले आहे.

महिला व बाल विकास विभागाच्या शासन निर्णयानुसार आरक्षणाचा लाभ ज्यांच्याकडे महिला व बाल विकास विभागा कडून देण्यात येणारे अनाथ प्रमाणपत्र असेल, तसेच ज्या मुलांच्या कागद पत्रावर कोणत्याही जातीचा उल्लेख नाही व ज्यांचे आई वडील, काका-काकू, आजी-आजोबा व चुलत भावंड व इतर नातेवाईकच्या बाबत माहिती उपलब्ध नाही. अशानांच खुल्या प्रवर्गातून समांतर आरक्षणाचा लाभ मिळेल.

## अ. अनाथ प्रमाणपत्र मिळण्यासाठीचे आवश्यक निकष:-

१. महिला व बाल विकास विभागाच्या बालगृहातील प्रवेशित बालकांच्या आई-वडिलांचा शोध घेऊन, त्यांपैकी कोणीच हयात नसल्याबाबतची खात्री झालेली असल्यास.
२. ज्यांचे आईवडिल हयात नसून त्यांच्याकडे जातीचे प्रमाणपत्र नाही. नातेवाईकांचा शोध लागलेल व जात माहित असल्यास जातीचा उल्लेख करुन अनाथ प्रमाणपत्र देण्यात येते.

ऊरील दोन्ही बाबीची पूर्तता करीत असताना संबधित बालगृह अधिक्षकांनी मुल अनाथ असल्याचे प्रमाणित करणे आवश्यक आहे असे मा.विभागीय उपायुक्तांनी स्पष्ट केले. अनाथ मुळ प्रमाणपत्र देण्याचे अधिकार आता विभागीय उपायुक्तांना देण्यात असल्याचे ही त्यांनी सूचित केले. संस्था अंतर्गत मुलासाठी अधिक्षक, जिल्हा महिला बाल विकास अधिकारी, बाल कल्याण समिती विभागीय उपआयुक्त अशा प्रक्रियेतून अनाथ प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया होते.

संस्था बाह्य मुलांसाठी अनाथ प्रमाणपत्राचा अर्ज प्रथम जिल्हा महिला बाल विकास विभागकडे करण्यात यावा. बाल कल्याण समिती नेत्याची छाननी करुन आवश्यकता असल्यास महसूल विभाग व पोलीस विभाग ह्यांचे अहवाल प्राप्त करुन घेऊन तशी शिफारस विभागीय उपआयुक्तांनी करावी.

## ब.अनाथ आरक्षण प्रमाणपत्राची फेर तपासणी :-

नवीन अनाथ आरक्षण प्रमाणपत्रच्या अनुषंगाने एखादया मुलाची नोकरीमध्ये नियुक्ती झाल्यास त्याने विनंती अर्ज सादर केलेल्या अनाथ प्रमाणपत्राची फेर तपासणी आयुक्त महिला व बाल विकास, पुणे यांच्या मार्फत करणे आवश्यक राहिल

**मा. विभागीय उपआयुक्त महाराष्ट्र राज्य** यांनी आपले मत मांडताना महिला व बाल विकास विभागाच्या शासन निर्णयानुसार आरक्षणाचा लाभ अनाथ मुला मुलींनाच मिळणार ज्याच्याकडे महिला व बाल विकास विभागाकडून देण्यात येणारे अनाथ प्रमाणपत्र असणाऱ्या मुलानांच लाभ मिळेल.

१. बाल कल्याण समिती आपल्या शिफारसी सह अर्ज विभागीय उपायुक्त,महिला व बाल विकास यांच्याकडे निर्णयार्थ पाठवेल (अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ४० दिवसात)

२. बाल कल्याण समितीची शिफारस विचारात घेऊन विभागीय उपायुक्त, महिला व बाल विकास यांच्या कडून अनाथ प्रमाणपत्र देण्यात येईल (याकरिता कोणतीही कालमर्यादा नाही)
३. बाल कल्याण समितीची शिफारस अमान्य करण्यात आल्यास विभागीय उपायुक्त महिला व बाल विकास यांच्या कडून कारणासहित अर्ज बाल कल्याण समितीकडे परत पाठविण्यात येईल.
४. आयुक्त, महिला व बाल विकास हे अपीलीय अधिकारी राहतील. प्रमाणपत्राच्या अनुषगांने जर काही तक्रार असल्यास.)

**अनाथ प्रमाणपत्र बाबत सदयस्थितीचा लेखाजोखा :-**

१. महाराष्ट्रात १०० बालगृहातून अंदाजे ३५०० मुले अनाथ आहेत.त्यामुलांमध्ये ०-६ वयोगटातील मुलांचा समावेश आहे.
२. एकूण ७० अनाथ प्रमाणपत्रासाठी अर्ज केल्यापैकी ३३ मुलांना अनाथ प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे.
३. प्रवेशित जर वयाच्या १७ व्या वर्षापर्यत एकाच संस्थेत वाढले असेल तर मुलांचे / मुलींची माहिती मिळणे सोपे जाते पण मुलगा / मुलगी विविध बालगृहातून transferहोत असल्यास प्रत्येक बालगृहाची माहिती एकत्रित करुन संकलित अहवाल करण्यास वेळ जातो.
४. काही बालगृहातील मध्ये मुलांच्या नोंदी परिपूर्ण व अद्यावत नाहीत.ज्या नोंदी अर्धवट व अपूर्ण आहेत. त्या नव्याने पूर्तता करणे कठीण व जिकीरीचे आहे.
५. अनाथाना आरक्षण व शिक्षण व नोकरीतून खुल्या प्रवर्गातून १% समांतर आरक्षणाचालाभ मिळाव ह्या दृष्टीने मुलांच्या शिक्षणावर चांगला भर देणे गरजेचे आहे.

श्री. प्रभाकर दि. करंदीकर भा.प्र.से. (निवृत्त) अध्यक्ष,ह्यांनी आपले मत व्यक्त करताना अनाथ खुल्या प्रवर्गातून १% समांतर आरक्षणाची संकलपना व्याप्ती व अंमलबजावणी ह्या विषयी स्पष्टता येण्याची गरज असल्याचे नमूद केले.अनाथांना नोकरी व शिक्षणासाठी खुल्या प्रवर्गातून १% समांतर आरक्षण देण्याचा अध्यादेश राज्य सरकारने एप्रिल २०१८ महिन्यात घेतला. परंतू त्यांची अंमलबजावणीला प्रलंबित आहे. २०१८-२०१९ ह्या शैक्षणिक वर्षात शाळा महाविदयालयात प्रवेश घेताना या तरतुदीचा काहीच उपयोग झाला नसल्याची माहिती समोर आली आहे. विविध शासकीय पदासाठी अनाथांसाठी आरक्षण ठेवलेले नाही.

**अनाथ मुलाचे पुनर्वसन / पुर्नस्थापन/पुर्नएकत्रीकरण संदर्भातील चर्चेत आलेले मुद्दे :-**

१. अनाथ प्रमाणपत्र व१% समातर आरक्षण ह्याचबरोबर संस्था बाह्य मुलांचे पुनर्वसन बाबत ही विचार ठोसदस्तऐवज असणे गरजेचे आहे.
२. आपली समाज व्यवस्था ही जाती वर आधारित असूनशिक्षण व्यवस्थापनामध्ये बालकास शाळेत प्रवेश घेत असताना त्या बालकाचे वडिलांचे नाव लावावे लागते शिक्षणाचा अधिकार २००५ नियमानुसार प्रत्येक मुलास शिक्षणाचा अधिकार असल्याचे अधोरेखित आहे.
३. खुल्या प्रवर्गातून १% समांतर आरक्षणामध्ये फक्त काळजी व संरक्षणाची गरज असेलेल्या मुलांचा समावेश आहे. परंतू विशेष बालकांना ह्या आरक्षणाचा लाभ मिळत नाही.
४. संपूर्णत: अनाथ असलेल्या ज्याला आई-वडील, जात-धर्म माहित नाही अशासाठी खुल्या प्रवर्गातून १% समांतर आरक्षण लागू आहे.

अनाथ मुलांच्या विविध समस्या संदर्भात महिला व बाल विकास विभागाने इतर विभागाशी समन्वय साधने आवश्यक आहे. १५ वर्षापुढील सर्व अनाथ बालकांना कौशल्य विकास योजनेतंर्गत प्रशिक्षण देण्यात येण्यात असल्याचे सांगून अनाथ मुलानी त्यांच्या आवडीचे आणि त्यांच्यात असलेल्या कौशल्यानुसार विविध कोर्सेसचे प्रशिक्षण देण्याचा प्रयत्न केला जाईल असे त्यांनी नमूद केले. अनाथ मुलांचा भावी आयुष्यात स्वत:च्यापायावर उभी राहू शकतील याबाबत विभाग खुल्या प्रवर्गातून समांतर आरक्षण अंमलबजावणी संदर्भात वस्तुनिष्ठ पध्दतीने बघणे अनिवार्य असल्याचे प्रतिपादन डॉ.सुनील कुमार लवटे ह्यांनी नमूद केले.

## १% समांतर आरक्षणाच्या अंमलबजावणीतील अडचणी :-

सन २०१२ मध्ये शासनाच्या महिला व बाल विकास विभागातर्फे अनाथ प्रमाणपत्र देण्याचा निर्णय झाला. १% खुल्या वर्गातील संमातर आरक्षणाचे लाभार्थी ही महाराष्ट्रात अपवादानेच सापडतील. अनाथ मुलांसाठी चे आरक्षण हे केवळ मृगजळ आहे.सज्ञान अनाथांसाठी १% आरक्षण मागासवर्गीय प्रवर्गात देण्याच्या ऐवजी प्रत्यक्षात मात्र खुल्या प्रवर्गात दिले आहे,ते पण समांतर आहे.म्हणजे हे मूळ ५१% घटनात्मक आरक्षण नाही.

१. अनाथांना प्रमाणपत्र मिळण्याचीप्रक्रिया किचकट व क्लिष्टआहे.
२. आरक्षणाच्या अंमलबजावणीबाबत अधिकाऱ्यांना मार्गदर्शन नाही.
३. आर्थिक नियोजन,निधीची स्वतंत्र व्यवस्था नाही.
४. प्रस्तावित आरक्षणाचा फायदा फक्त पूर्ण पणे अनाथ असलेल्यात्यानाच मिळेल.
५. निराधार, निराश्रित मुलाना ह्याचा लाभ मिळणार नाही. संस्थेत सध्या अनाथ म्हणून वास्तव्यास असलेले व बालगृहातून १८ वर्षानंतर बाहेर पडणाऱ्या मुलाना हे लागू होईल.

## अनाथ मुलाची सदयस्थितीचा लेखाजोखा :-

बाल न्याय अधिनियम २०१५ च्या कायद्यानुसार 'अनाथ' ची व्याख्या करताना कायद्यानुसार पहिल्या भागात, ज्या बालकांचे पालक, नातेवाईक, जात धर्म ह्या बाबत अजिबात माहित नाही किंवा ते शोधून ही सापडत नाहीत, अशी बालके 'संपूर्णतः अनाथ' म्हणून गणली जावीत, तर दुसऱ्याटप्प्यात ज्या बालकांना पालक आहते किंवा त्याच्या पालका बद्दल थोडी माहिती आहे, परंतु त्यांना 'काळजी व संरक्षणाची' नितांत आवश्यकता आहे अशा अनाथ बालकांना बालगृहात दाखल केले आहे. त्यांनाही 'अनाथ' म्हणावे, समजले जाते खरंतर वरवर दिसणारी 'काळजी आणि संरक्षण' अंतर्गत येणारी बालके बहुतांशी पालकांचा बेजबाबदारपणा, नवरा-बायकोतील भांडणं, नातेसंबंधातील कलह, पालकांचं आजारपण, आर्थिक कमतरता यामुळे बालगृहात दाखल केली जातात. मग त्यां बालकाना 'अनाथ' म्हणावे का?असा प्रश्न पडतो. याशिवाय द्विपालक, एकपालकत्व असलेली मुले, गरीब कुटुंबातीलमुले, रस्त्यावर भीक मागणारी, 'बालकामगार अशी सर्वच विभागांतील मुले सुध्दा बालगृहात दाखल होत असतात आणि एकदा काही ही मुले बालगृहात वा अनाथालयात दाखल झाली की कायद्यानुसार ही मुले 'अनाथ' म्हणून अनुदानासाठी पात्र ठरतात.

आजमितीस महिला व बाल विकास विभाग महाराष्ट्रराज्य शासन अंतर्गत राज्यात सुमारे ९०० बालगृहे कार्यरत असुन सुमारे ७० हजार प्रवेशित असून अनाथ,निराधार मुले ह्या बालगृहे राहतात. त्यामध्ये पालक असलेलीव पूर्ण अनाथ अशी १५% मुले-मुली आहेत ह्या बालगृहे राहणायामुलापैकी पुनर्वसनक्षम म्हणजेच (१८वर्ष पूर्ण होणारी) सुमारे २५०० मुले-मुली दर वर्षी संस्थेतून बाहेर पडतात. अनाथ बालकांच्या आरक्षणाचा प्रश्न निगडित आहे तो या ''संस्थाश्रयी सज्ञान झालेल्या अनाथ मुला-मुलीचा''राज्यात आज अवघी सात शासकीय अनुरक्षणगृहे असुन त्यामध्ये २५० मुले राहत आहेत १८ वर्षावरील युवक/युवती राहत आहेत. तर १८ वर्षावरील मुलींसाठी १ एक शासकीय अनुरक्षणगृहे आहे. ज्यामध्ये फक्त ४० मुली प्रवेशित राहत आहेत. ही जी अनुरक्षणगृह मुंबई,पुणे,नाशिक,औरंगाबाद, अमरावती,कोल्हापूर यासारख्या महानगरात आहेत.परंतु ह्या मुलासाठी अनुकूल व पोषक( Enabliy Environment)वातावरणाच्या आभावी येथील प्रवेशिता मुलांची संख्या नगण्य आहे.संस्थेतून सज्ञान होऊन बाहेर पडणाऱ्या फक्त १० % अनाथ मुलां-मुलीची सोय होते बाकी ९०% मुलाचे पुर्नवसन/पुर्नस्थापना /पुर्नएकत्रीकरण हा एक सामाजिक गंभीर प्रश्न आहे.१६ ते २२ वर्षे वयोगटातील मुलांच्या कृती आराखड्याची योग्य अंमलबजावणी झाल्यास बालहक्क कायद्यानुसार ''काळजी व संरक्षण गरज'' अशा संज्ञेत येणाऱ्या अनाथ, निराधार व निराश्रित मुलांना देशाचे सन्माननीय नागरिक म्हणुन स्थान मिळेल असा विश्वास अनाथ, निराधार व निराश्रित मुलांसाठी कार्यरत संस्थाचे पदाधिकारी, कर्मचारी व संबधित शासकीय पदाधिकारीह्यांनी व्यक्त केला.

## *परिसंवादातील खुली चर्चेस मांड्ण्यात आलेले मुद्धे*

*परिसंवादाच्या खुल्या चर्चे द्रम्यानतज्ञविषय,साधन व्यक्ती, ह्यानी अनाथ निराधार निराश्रित मुलांबरोबर काम असताना आलेले स्व अनुभव, भारत व भारता बाहेरील इतर देशांत ह्या मुलांच्या परिस्थिती संदर्भातील केलेला अभ्यास,जिल्हा महिला बाल विकास अधिकारी, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी, शासन व स्वयंसेवी संस्था कर्मचारी, शासकीय कर्मचारी, शासकीयगृह - निमशासकीयगृह अधिकारी आणि समाज यांची काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या मुलांच्या संगोपनातील भूमिका व जबाबदारी ह्या बाबत ह्या पारिसंवादामध्ये मते मांड्ण्यात आली.*

*बाल कल्याण समितीच्या आदेशानुसारअनाथ निराधार निराश्रीत मुले बालगृहात प्रवेशित होतात. ''संस्थात्मक पालक'' म्हणून बाल कल्याण समितीची भुमिका खूप महत्वाची आहे. अनाथ निराधार निराश्रित मुलांना स्वत:च्या पायावर उभे करुन समाजाचा जबाबदार घटक निर्मिती प्रक्रियेत सरकारची भुमिका संस्था ''पालकत्वाच्या नात्याने'' फार महत्वाची आहे.*

१. *'बाल कल्याण समिती सदस्याना,काळजी आणि संरक्षण' अंतर्गत येणाऱ्या बालकांना बालगृहामध्ये प्रवेश देणे बाबत अनुसरावयाची कार्यपध्द्ती,'बाल कल्याण समितीचे अधिकार, बालकांचे मूलभूत हक्क, कर्तव्य व प्रशासकीय यंत्रणा तसेच अनाथ मुलाना अनाथ प्रमाणपत्र देणे तसेच काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या मुलाच्या विकास आराखडया बाबत बालग्रहतील विविध कर्मचायाना व 'बाल कल्याण समिती ह्याना प्रशिक्षण देण्यात यावे असे नमुद केले.*

२. *बालगृहे मध्ये दिर्घ मुद्तीपर्यत प्रवेशित बालक असेल व त्या मुलाला अनाथ प्रमाण्पत्र देणे कामि आवश्यक त्या सेर्व बाबीची (कागदपत्रांची) पुतता करुन परिपुण प्रस्ताव बाल कल्याण समिती कडे साद्रर करणे गरजेचे आहे.*

३. *एखाद्या बालकाला अन्य संस्थेत पाठविणेत आला असेल व तशी नोंद संस्था पटलावर असेल तर अशा बालकांच्या बाबतीत पुढील संस्थाचे वास्तव्य प्रमाणपत्र मिळणेस विलंब होत असेल तर अशावेळी मूळ संस्था प्रवेश ग्राहय म्हणून त्याच संस्थेमार्फतच अनाथ प्रमाणपत्र मिळणे कामी प्रस्ताव त्याच जिल्ह्यातील बाल कल्याण समिती/ जिल्हा बाल समिती विकास अधिकारी यांचे समोर सादर करुन पूर्तता होणे कामी कार्यवाही व्हावी.असे नमुद केले.*

४. *ज्या मुलांचे हक्क सोडपत्र झालेले आहे व बाल कल्याण समितीने त्या बालकांस दत्तक मुक्त म्हणून घोषित केलेले आहे. परंतु त्या बालकांला कायदेशीर दत्तक पालक मिळाले नाहीत तर त्या बालकांला वयाच्या ६ वर्षापर्यते बाल कल्याण समितीने शिशुगृहात प्रवेशित केले असल्यास त्या बालकांची वयाची ६ वर्षे पूर्ण होताच त्या बालकाला 'अनाथ' म्हणून घोषित करुनच त्या बालकांचा प्रथम शाळा प्रवेश करुन शालेय दाखल्यावर अनाथ अशी नोंद व्हावी ह्या बाबत कार्यवाही होणे गरजेचे आहे.*

५. *अनाथ प्रमाणपत्र व खुल्या प्रवर्गातून १%समांनतर आरक्षणा लाभ,विधि संघर्षग्रस्त बालके की ज्या मुलाच्या पालक अथवा नातेवाईक बाबत कोणतीहि माहिती उपल्बध नाही अशा,विधी संघर्षग्रस्त* (children in Conflict with Law) *अनाथ बालकांच्या बाबतीत देखील विचार होणे गरजेचे आहे.*

६. *संस्था प्रवेशित बालकांना अनाथ प्रमाणपत्र मंजूर करतांना सदरचे अनाथ पत्राचा उपयोग शैक्षणिक, प्रशिक्षण, शिष्युवृत्ती, नोकरी तसेच पुनवर्सन व शासकीय सुविधांचा लाभ घेणेसाठी परिपूर्ण असेल असा उल्लेख असावा. असे सुचविण्यात आले.*

७. *जी बालके अनाथ आहेत व अनाथ प्रमाणपत्र मिळणे कामि पात्र असणारे बालकांच्या बाबत अनाथ प्रमाण पत्राचे प्रस्ताव व प्रमाणपत्र संस्थामध्ये राहत असलेल्या कालावधित पूर्ण करुन घ्यावेत.*

८. *मा. आयुक्त महिला व बाल विकास महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी निर्धारित केलेले अनाथ प्रमाणपत्र हेच अंतिम असावे व त्यांस राज्यमान्यता आहे असा उल्लेख असावा.*

९. *अनाथ, निराधार, निराश्रित मुले बालगृहातून मुले बाहेर पडल्यावर त्यांना जन्माचा जातीचा दाखला व संबंधित कागदपत्रे / दस्ताऐवज मिळवण्यासाठी झगडावे लागते. शासकीय / निमशासकीय गृहांच्या (ज्या गृहात ते मुल दाखल झाले असेल) अधिक्षकांनी मुलाच्या / मुलींच्या जन्माचा दाखला तातडीने*

*काढून घेणे गरजेचे आणि महत्वाचे आहे. प्रधानमंत्री कौशल्य योजना /जिल्हा उद्योग केंद्र याच्या विविध योजनांचा तसेच इतर शासकीय योजना ह्या अनुरक्षणगृहाशी* (After Care Homes) *जोडणे आवश्यक. (शासन निर्णयक)अनाथ मुलांकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन बदलण्यासाठी देखील ठोस काम करणे गरजेचे आहे.*

१०. *संस्थेमध्ये दाखल करताना ज्या बालकाला काळजी व संरक्षण गरज आहे. अशा बालकांना संस्थेमध्ये प्रवेश मिळावा एक पालक किंवा आर्थिक परिस्थिती घरी मुलांना संभाळण्यासाठी कोणी नाही आई-वडील कामावर जातात किंवा मुलगा पालकांचे ऐकत नाही म्हणून मुलांना संस्थेमध्ये प्रवेश देऊ नये.*

११. *शासन निर्णय २ एप्रिल २०१८ मुद्यावर १ ज्या बालकांना पालक आहे. परंतू ते सांभाळ करत नाहीत किंवा नावाला फक्त काका-काकू, आजी आजोबा मामा-मामी भावंडे आहेत. अशा मुलांना अनाथ म्हणून गणले जाणार का नाही ह्या बाबत स्पष्टता नाही ह्यामुलाचे भवितव्य काय?*

## चर्चेतून आलेले महत्त्वाचे मुद्दे

१. *१% आरक्षणा मधुन जात व धर्म काढून टाका कारण मुले अनाथ आहेत त्यांना अनाथ म्हणून सवलती दिल्या गेल्या पाहिजेत.*

२. *१८-२२ वर्षापर्यंतच्या १००% अनाथ मुलांचे* institutionalization *होणे कामी प्रयत्न होणे गरजेचे आहे.*

३. *अनुरक्षणगृहातील सेवा सुविधांचा दर्जा व गुणवत्ता* (Quality of services) *राहण्यायोग्य अनुकूल वातावरण* (enability environment) *ह्या बाबत्तीत विचार करणे गरजेचे आहे*

४. *सर्वच अनाथ मुले शिक्षणाच्या प्रवाहात नसल्याने सरकारने विविध पदासाठी जाहिरात प्रकाशित करताना ड.प्रभागात मध्ये १% समांनतर आरक्षणा देणे बाबत ही विचार करणे गरजेचे आहे.*

५. *ज्या अनाथ प्रवेशित मुलांची जात ते मुल बालगृहात प्रवेशित करीत असताना संस्था अधिक्षकांनी ठरविली आहे / होती ती जात आता रद्दबातल करण्यात यावी अशा प्रकारचा निर्णय घेण्यासाठीशासनास्तरावर शिफारस करावी असेसर्वानुमतेठरले.*

६. *ज्या मुलांची जात माहित आहे.(नातेवाईकांची शोध लागत आहे) अशा मुलांना खुल्या प्रवर्गातून १% अनाथ आरक्षण मिळेल व जातीनिहाय लागू असलेले ही आरक्षण व सेवा सुविधा लागू होतील.*

७. *पूर्णपणे अनाथ असलेल्या पण आवश्यक कागदपत्रची पूर्तता न झाल्यामुळे अशी मुले अनांथ प्रमाणपत्र व अनाथ प्रमाणपत्र नसल्यामुळे खुल्या प्रवर्गातून १% समांतर आरक्षणाचा लाभ मिळण्या पासुन वंचित राहतात अशावेळी* affidetivte *च्या माध्यमातून प्रश्न सोडवला जाऊ शकतो यासाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे.*

*१६ ते २२ वर्षे वयोगटातील मुलांच्या कृती आराखड्याची योग्य अंमलबजावणी झाल्यास बालहक्क कायद्यानुसार ''काळजी व संरक्षण गरज'' अशा संज्ञेत येणाऱ्या अनाथ, निराधार व निराश्रित मुलांना देशाचे सन्माननीय नागरिक म्हणुन स्थान मिळेल असा विश्वास अनाथ, निराधार व निराश्रित मुलांसाठी कार्यरत संस्थाचे पदाधिकारी, कर्मचारी व संबधित शासकीय पदाधिकारीह्यांनी व्यक्त केला.*

## *राज्यस्तरीय परिसंवादातुन आलेल्या शिफारशी:*

*१. ''अनाथ दाखला'' देण्याचे अधिकार संस्था चालकांना देण्यात यावेत तसेच अनाथ प्रमाणपत्र प्राप्त कागदपत्रांच्या यादीवर पुर्नविचार करुन ती प्रक्रिया सुलभ करणे.*

*२. संस्था बाह्य मुलांना देखील अनाथ दाखला व तत्सम सुविधा मिळणे आवश्यक आहे.*

*३. अनाथ प्रमाणपत्र,खुल्या प्रवर्गातून१% समातर आरक्षण, ह्या पेक्षा संस्था बाह्य मुलांचे पुनर्वसन ह्या बाबतीत काम करणे गरजेचे आहे.*

*४. अनाथ मुलाना अनाथ प्रमाणपत्र देणे बाबतीमधील शासन निर्णयमध्ये बाल कल्याण समिती, विभागीय उपायुक्त कार्यालय, संस्था अधिक्षक, पोलीस महिला व बाल विकास अधिकारी या शासन यंत्रणा जबाबदारी/भूमिकाबाबत स्पष्टता होणे गरजेचे आहे*

*५. अनाथ प्रमाणपत्र प्राप्त करणे कामी आवश्यक असलेली कागद पत्रे ह्याबदल शासन निर्णयामध्ये स्पष्टता होणे गरजेचे आहे*

*६. खुल्या प्रवर्गातून देण्यात आलेल्या १% समातर आरक्षण मध्ये फक्त काळजी संरक्षण गरज असेलेल्या मुलांचा समावेश आहे. परंतू विशेष बालके ह्या आरक्षण लाभ देण्यात यावा*

*७. अनाथांच्या १% आरक्षण शिक्षण, व नोकरी आणि 'ब' या गटात मोडणाऱ्या शासकीय नोकऱ्यासाठी आहे. परंतु सदरील आरक्षण हे पद इतर क व ड स्तरसाठी लागु करावे.*

*८. सध्याची अनाथ प्रमाण पत्र देण्याची प्रक्रिया खूप अवघड/ किचकट व किष्ट आहे.*

*९. अनाथ प्रमाणपत्रांबाबत प्रस्ताव दाखल झाल्यानंतर ४० दिवसांत पूर्णत: कार्यवाही होणे बंधनकारक असावे.*

*१०. अनाथ प्रमाणपत्र व अनाथ आरक्षण प्रक्रिया सुलभ व तत्पर होण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र शासनाने सबंधित विभागाशी समन्वय साधून आवश्यक त्या सूचना निर्गमित कराव्यात.*

*११. संस्था प्रवेशित बालकांना अनाथ प्रमाणपत्र मंजूर करतांना सदरचे अनाथ पत्राचा उपयोग शैक्षणिक, प्रशिक्षण, शिष्युवृत्ती, नोकरी तसेच पुनवर्सन व शासकीय सुविधांचा लाभ घेणेसाठी परिपूर्ण असेल असा उल्लेख असावा.*

*१२. मा. आयुक्त महिला व बाल विकास महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी निर्देशित केलेले अनाथ प्रमाणपत्र हेच अंतिम असावे*

*१३. २ एप्रिल २०१८ चा १ % आरक्षणाच्या जि आर मधील १० नं च्या मुद्द्यामध्ये अनाथ आरक्षणाबाबत करावयाच्या कार्यवाहीच्या अनुषंगाने सविस्तर मार्गदर्शक सुचना लवकर स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात याव्यात.*

*१४. अनुरक्षणगृहाच्या सुविधेत सुधारणा होणे अतिशय गरजेचे आहे*

*१५. मुलाच्या शाश्वत विकास आराखड्यांची अतिशय आवश्यकता आहे*

*१६. मुलांच्या पुर्नवसनासाठी आधार कार्ड, रेशन कार्ड व इतर आवश्यक दस्ताऐवज मिळतील या साठी प्रयत्न होणे गरजेचे आहे*

*१७. अपंगाना दिव्यागाच्या आधारे जसे आरक्षण देण्यात आले,त्याचाच आधार घेऊन अनाथांना अनाथ तत्वाच्या आधारे अनाथ प्रमाणपत्र देण्यात यावे*

*१८. बालगृह/अनुरक्षणगृहातून बाहेर पडल्यावर सामोरे जावे लागत असणाऱ्या अडचणीं कमी करण्याच्या हेतुने मुलांचा काळजी आणि संरक्षण विषयक विकास आराखडा विकसित करणे व अंमलबजावणी*

*१९. अनाथ निराधार निराश्रित मुलांच्या बालगृहाच्या वास्तवाच्या दरम्यान त्यांची शिक्षणातील प्रगती असलेल्या आवडी व सवयी, उच्च शिक्षण घेण्याची क्षमता ह्या सर्व महत्वाच्या बाबींवर विचार होणे गरजेचे आहे.*

२०. *अनुरक्षण गृहातील मुलांसाठी सहाय्यव्यवस्था* (Support Systems) *बळकटीकरण करण्याच्या उद्देशाने स्वयंसेवी संस्थांनी शासनाच्या शिक्षण / आरोग्य / उपजिविका यासंदर्भातील विविध योजना ज्या अनुरक्षणगृहात राहणाया मुलाशी संलग्न आहेत त्याचा अभ्यास करुन त्याची अंमलबजावणी करणे*

२१. *'अनाथ'' शब्दाची व्याख्या पुन्हा नव्याने स्पष्टहोणे अत्यंत गरजेचे आहे.*

२२. *बालगृहात प्रवेशित व दाखल होणारे प्रत्येक मुल पुर्णपणे अनाथ असतेच असे नाही. काही मुलांचे नातेवाईक असतात तर काही मुलांना एक पालकत्व आहे, बालगृहातील ज्या मुलांची पार्श्वभुमी/ कौटुंबिक माहिती बालगृहाकडे उपलब्ध आहे. त्यांचा धर्म, जातीबद्दल माहिती आहे. परंतू ज्यांचे कुणीच नाही अशा मुलांना जात, धर्माच्या चौकटीत न बांधता मानव हा धर्म व ''मानवता'' ही जात हाच सर्व मान्य आधार असावा*

२३. *बालगृहामधिल मुलांच्या उच्च शिक्षणासाठी आर्थिक निधीची तरतुद असावी तसेच मुलांमधील कौशल्ये आणि त्याला ज्या क्षेत्रात करीअर करायचय त्यानुसारच कोर्सेससाठी देखील शासनाने आर्थिक तरतुद उपल्बध करणे देणे बाबत विचार होणे गरजेचे आहे .*

२४. *संस्थेमध्ये दाखल करताना ज्या बालकाला काळजी व संरक्षण गरज आहे. अशा बालकांना संस्थेमध्ये प्रवेश मिळावा एक पालक किंवा आर्थिक परिस्थिती घरी मुलांना संभाळण्यासाठी कोणी नाही, आई-वडील कामावर जातात किंवा मुलगा पालकांचे ऐकत नाही म्हणून मुलांना संस्थेमध्ये प्रवेश देऊ नये..*

२५. *अनाथांना समान संधी व समान हक्क आणि पुर्नवसन अधिनियम लागू करावा.*

## राज्यस्तरीय परिसंवादाची सांगता :-

*राज्यस्तरीय परिसंवादाची सांगताकरत असतानामुख्य कार्यकारी अधिकारी स्टापी ह्यांनी १६-१८ वयोगटातील बालगृहातील / अनाथ गृहातील मुले १६-१८ व्या वर्षी बालगृहातून बाहेर पडताना पुन्हा अनाथ होतात हे वास्तव जाणून घेतल्यानंतर २०१३ साली ''प्रकल्प मायाची'' जडण-घडण झाल्याचे नमूद केले.तसेच''माया'' प्रकल्पाचे विविध टप्पे स्पष्ट केले.तसेचप्रकल्प ''माया'' अंतर्गत अनाथ, निराधार, निराश्रित मुलांचे पुनर्वसन ह्या व्यापक प्रश्नान अनेक विविध पैलू आहेत आणि म्हणूनच ह्या प्रश्नांवर काम करायचे असेल तर सर्वांनी एकत्र येऊन काम करणे गरजेचे आहे*

*माया प्रकल्प अंतर्गत नोडल एजन्सची म्हणुन अनाथ प्रमाणपत्र, १% आरक्षण ,पुनर्वसन, अशा बालकाशी निगडीत मुद्देस अनुसरुन काम करणेसाठी आमची संस्था महाराष्ट्र राज्य परिविक्षा व अनुरक्षण संघटना, ह्याच्या समन्वयानेमहिला व बाल विभागाला पूर्णपणे सहकार्य करेल अशी ग्वाही स्टापीमुख्य कार्यकारी अधिकारी ह्यानी सर्व उपस्थितांना दिली. शासन यंत्रणाने एका अनाथाना अनाथ प्रमाणपत्र देणेबाबत घेतेलेल्या विशेष पारिश्रमास सर्व उपस्थितानी दाद दिली व शासनाचे आभार मानले*

*दिनांक २३ जानेवारी २०१९रोजीच्या राज्यस्तरीय परिसंवादाची सांगता सर्व उपस्थित शासकीय संस्था/निमशासकीय संस्था/सरकारी अधिकारी प्रतिनिधी / शासन तसेच संस्था संचालित बालगृहे/ अनुरक्षणगृहांचे प्रतिनिधी/ विषय तज्ञ व्यक्ती आणि महाराष्ट्र राज्य परिविक्षा व अनुरक्षण संघटना अधिकारी तसेचअनाथ, निराधार, निराश्रित समाजातील प्रतिनिधी व ह्या राज्यस्तरीय परिसंवादास आर्थिक सहाय्य करणाऱ्या* Bombay community Public Trust *ह्यांच्या आभार प्रदर्शनाने झाली.*

**महिला व बाल विकास विभाग महाराष्ट्र राज्य**

**अनाथ मुलांना खुल्या प्रवर्गातून शिक्षण व नोकरी ह्यामध्ये १%समांतर आरक्षण शासन निर्णय वर्षपूर्ती परिसंवाद**

**आयोजक** - सोस्वा ट्रेनिंग ॲण्ड प्रमोशन इन्स्टिटयुट,(स्टापी) व सनाथ वेलफेअर फाउंडेशन पुणे

**समन्वय व सहकार्य** - महिला व बाल विकास विभाग महाराष्ट्र राज्य

**प्रायोजक** - बॉम्बे कम्युनिटी पब्लिक ट्रस्ट मुंबई

**स्थळ: सोस्वा ट्रेनिंग ॲण्ड प्रमोशन इन्स्टिटट्यूट (स्टापी ), पुणे**

**दिनांक .२३.१.२०१९**

**कार्यक्रम पत्रिका**

| **वेळ** | **कार्यक्रम तपशील** | **साधन व्यक्ती / सत्र समन्वयक** |
|---|---|---|
| ०५.०० - ०५.२० | नोंदणी | श्रीमती. मनिषा माने प्रशिक्षण विभाग |
| ०५.२० - ०५.३० | स्वागत व प्रास्तविक | सनाथ वेलफेअर फाउंडेशन, पुणे प्रतिनिधी |
| ०५.३० - ०५.४५ | परिसंवाद पार्श्वभुमी व उद्देश | श्रीमती.गायत्री पाठक<br>संचालक, सनाथ वेलफेअर फाउंडेशन, पुणे |
| ०५.४५ - ०६.०० | सहभागी परिचय | शासन/ स्वयंसेवी संस्था प्रतिनिधी |
| ०६.०० -०६.१५ | अनाथ मुलांना खुल्या प्रवर्गातून शिक्षण व नोकरी ह्यामध्ये १% समांतर आरक्षण देण्यासंदर्भातील शासनाची भूमिका | मा.डॉ.हृषिकेश यशोद, भा.प्र.से.<br>आयुक्त ,<br>महिला व बाल विकास ,महाराष्ट्र राज्य |
| ०६.१५ - ०८.०० | **खुली चर्चा :**<br><br>१.अनाथ मुलांना खुल्या प्रवर्गातून १% समांतर आरक्षण देण्याबाबातची शासनाची भूमिका<br><br>२.शासन निर्णय अंमलबजावणीतील अडचणी व आव्हाने,<br><br>३.१% समांतर आरक्षणाचा लाभ अनाथ मुलांना होण्याच्या दृष्टीने काही ठोस उपाययोजना व शिफारशी<br><br>४. अनाथ प्रमाणपत्र देण्यासंदर्भातील प्रक्रिया व निर्णय | उपस्थित मान्यवर<br>१.मा.श्री.रवी पाटिल<br>उप आयुक्त, महिला व बाल विकास,महाराष्ट्र राज्य<br>२.मा. पिठासिन आधिकारी, बाल न्याय मंडळ पुणे<br>३.मा.श्रीमती मनिशा बिरासीस,<br>सह आयुक्त तथा कार्यक्रम व्यावस्थापक,महाराष्ट्र राज्य बाल संरक्षण संस्था.पुणे<br>४.मा.दिलीप हिवराळे<br>विभागीय उप आयुक्त<br>पुणे विभाग, महाराष्ट्र राज्य<br>५.मा.अध्यक्ष/सदस्य बाल कल्याण समिती पुणे<br>६.मा. सदस्य,बाल न्याय मंडळ पुणे<br>७.श्रीमती. अश्विनी कांबळे<br>जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी<br>८.श्री. डी.एस.कुटे कार्यकारी सचिव<br>महाराष्ट्र राज्य परिविक्षा व अनुरक्षण संघटना,<br>९.श्री.जयंत पवणीकर<br>वरिष्ठ सल्लागार,युनिसेफ<br>१०.श्री. प्रभाकर डी. करंदीकर भा.प्र.से. (निवृत्त)<br>अध्यक्ष, सोस्वा ट्रेनिंग ॲण्ड प्रमोशन इन्स्टिटट्यूट (स्टापी)<br>११.डॉ. सुनिलकुमार लवटे<br>सल्लागार समिती सदस्य प्रकल्प माया<br>११.श्री. विष्णू बी. शेटे<br>सल्लागार समिती सदस्य प्रकल्प माया<br>१२.श्री.सुभाषचंद्र वाघोलीकर<br>सल्लागार समिती सदस्य प्रकल्प माया<br>१३.श्रीमती. साधना झाडबुके<br>सल्लागार समितीसदस्य प्रकल्प माया<br>१४.श्रीमती. सुजाता देशमुख<br>परिविक्षा आधिकारी गोंदिया<br>१५.श्री. मनोज ससे<br>उप मुख्य कार्यकारी अधिकारी ,बाल विकास विभाग, जिल्हा परिषद अहमदनगर |
| ०८.००- ०८.१५ | समारोप<br>आभार प्रदर्शन | १६.श्रीमती. परिणीता कानिटकर मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>सोस्वा ट्रेनिंग ॲण्ड प्रमोशन इन्स्टिटट्यूट (स्टापी) |

## Attendence Sheet – Government Official

①

**STAPI** | **BCPT**

**Consultation Meeting for 1% Orphan Reservation / Anath Certificate**
**Jointly Organized : Sosva Training And Promotion Institute (STAPI) and Sanath Welfare Foundation Pune**
**With Support Of : Women and Child Development Maharashtra State**
**Sponsored By : Bombay Community Public Trust (BCPT) Mumbai**

**Venue :- Sosva Training And Promotion Institute (STAPI)** **Date: 23 January 2019**

| Sr. No. | Name & Address of NGOs/Govt. Organization | Name & Designation of NGOs/Govt. Institution | Contact Details of NGOs/Govt. Institution | Signature |
|---|---|---|---|---|
| 1 | Shriranga. C. Patwardhan. Sanath Welfare foundation. Pune. | Sanath Welfare foundation. Pune Representative Member. | Land Line No.<br>Mobile No. 8087234462<br>Email ID vaibhavcp81@gmail.com | [signature] |
| 2. | Gayatri Pathak. Sanath Welfare foundation, pune. | Sanath Welfare foundation, pune. President | Land Line No.<br>Mobile No. 7776043131<br>Email ID gayatripathak1133 @gmail.com | Gayatri Pathak. |
| 3. | Sayali shankar koli. Sanath Welfare foundation, pune | Sanath Welfare foundation, pune. Representative Member | Land Line No.<br>Mobile No. 9527674907<br>Email ID-: sayalikoli80@gmail.com. | [signature] |

②

**STAPI** | **BCPT**

**Consultation Meeting for 1% Orphan Reservation / Anath Certificate**
**Jointly Organized : Sosva Training And Promotion Institute (STAPI) and Sanath Welfare Foundation Pune**
**With Support Of : Women and Child Development Maharashtra State**
**Sponsored By : Bombay Community Public Trust (BCPT) Mumbai**

**Venue :- Sosva Training And Promotion Institute (STAPI)** **Date: 23 January 2019**

| Sr. No. | Name & Address of NGOs/Govt. Organization | Name & Designation of NGOs/Govt. Institution | Contact Details of NGOs/Govt. Institution | Signature |
|---|---|---|---|---|
| 4. | Shamali. shankar koli. Sanath Welfare foundation, pune | Sanath Welfare foundation, Representative Member | Land Line No.<br>Mobile No. 8308143762<br>Email ID - shamalkoli2000@gmail.com. | S.S.Koli. |
| 5. | Santosh Gaikwad. अधिक्षक. | Deep. Griha. kasurdi a/p. kasurdi ta. Daund. Dist. Pune. | Land Line No.<br>Mobile No. 9665014168/9922643391<br>Email ID c.o.c.kasurdi@gmail.com. deepgriha@gmail.com | [signature] |
| 6. | Harish Awachar अधीक्षक | Mahal Sanstha. Vadu-Bll. Tal. shirur, Dist-pune - pin-412216 | Land Line No. 9011086131<br>Mobile No. 9623488414<br>Email ID mahalpune@gmail.com | [signature] |

③

STAPI | महिला व बाल विकास — WOMEN & CHILD DEVELOPMENT | BCPT

**Consultation Meeting for 1% Orphan Reservation / Anath Certificate**

**Jointly Organized : Sosva Training And Promotion Institute (STAPI) and Sanath Welfare Foundation Pune**

**With Support Of : Women and Child Development Maharashtra State**

**Sponsored By : Bombay Community Public Trust (BCPT) Mumbai**

**Venue :- Sosva Training And Promotion Institute (STAPI)** **Date: 23 January 2019**

| Sr. No. | Name & Address of NGOs/Govt. Organization | Name & Designation of NGOs/Govt. Institution | Contact Details of NGOs/Govt. Institution | Signature |
|---|---|---|---|---|
| 7 | Sadashiv R. Nikam<br>माजी विद्यार्थी | द.ना. सिरूर बालग्राम | Land Line No.<br>Mobile No. 7302541016<br>Email ID Sadya997@gmail.com | Shr. |
| 8 | Ravi P. Khot.<br>x Sudent | द.ना. सिरूर बालग्राम | Land Line No.<br>Mobile No. 7506601017<br>Email ID ravi1314thyrocare@gmail.com | |
| 9 | Surekha Dalvi<br>SOS Childrens Village - Pune | Surekha Dalvi<br>Asstt. Village Director<br>SOS CVI - Pune. | Land Line No.<br>Mobile No. 7066468980<br>Email ID surekha.dalvi@soscvindia.org. | |

④

STAPI | महिला व बाल विकास — WOMEN & CHILD DEVELOPMENT | BCPT

**Consultation Meeting for 1% Orphan Reservation / Anath Certificate**

**Jointly Organized : Sosva Training And Promotion Institute (STAPI) and Sanath Welfare Foundation Pune**

**With Support Of : Women and Child Development Maharashtra State**

**Sponsored By : Bombay Community Public Trust (BCPT) Mumbai**

**Venue :- Sosva Training And Promotion Institute (STAPI)** **Date: 23 January 2019**

| Sr. No. | Name & Address of NGOs/Govt. Organization | Name & Designation of NGOs/Govt. Institution | Contact Details of NGOs/Govt. Institution | Signature |
|---|---|---|---|---|
| 10 | Aditya. V.C<br>TISS. | | Land Line No.<br>Mobile No. 8600436253<br>Email ID | Aditya |
| 11) | बाल कल्याण संकुल<br>कोल्हापूर | सुभाष अशोक नारे.<br>कोल्हापूर | Land Line No.<br>Mobile No. 8208874935<br>Email ID | |
| 12) | शासकीय मुलांचे अनुरक्षणगृह येरवडा | श्रीम. आर. एस जावळे<br>P.O. प्र. अधिक्षक | Land Line No.<br>Mobile No. 8308954379<br>Email ID Vargikaranpune@gmail.com | RJawale |

5

Consultation Meeting for 1% Orphan Reservation / Anath Certificate

Jointly Organized : Sosva Training And Promotion Institute (STAPI) and Sanath Welfare Foundation Pune

With Support Of : Women and Child Development Maharashtra State

Sponsored By : Bombay Community Public Trust (BCPT) Mumbai

Venue :- Sosva Training And Promotion Institute (STAPI) Date: 23 January 2019

| Sr. No. | Name & Address of NGOs/Govt. Organization | Name & Designation of NGOs/Govt. Institution | Contact Details of NGOs/Govt. Institution | Signature |
|---|---|---|---|---|
| 13) | शासकीय मुलांचे वरिष्ठ बाल गृह | श्री. आर.एस. चव्हाण | Land Line No.<br>Mobile No. 9970238877<br>Email ID | [illegible] |
| 14) | सुभाषचंद्र वाघोलीकर | | Land Line No.<br>Mobile No. 9850406018<br>Email ID | [illegible] |
| 15) | जनसेवा फौंडेशन पुणे | भारती कि-कुचे<br>social worker.<br>co-ordinator. | Land Line No.<br>Mobile No. 8605695542<br>Email ID bhartikuche31@gmail.com | Bkuche |

Consultation Meeting for 1% Orphan Reservation / Anath Certificate

Jointly Organized : Sosva Training And Promotion Institute (STAPI) and Sanath Welfare Foundation Pune

With Support Of : Women and Child Development Maharashtra State

Sponsored By : Bombay Community Public Trust (BCPT) Mumbai

Venue :- Sosva Training And Promotion Institute (STAPI) Date: 23 January 2019

| Sr. No. | Name & Address of NGOs/Govt. Organization | Name & Designation of NGOs/Govt. Institution | Contact Details of NGOs/Govt. Institution | Signature |
|---|---|---|---|---|
| 16 | | Pravin Bhange<br>Hadapsar. | Land Line No.<br>Mobile No. 7709289100<br>Email ID | [illegible] |
| 17) | | [illegible]<br>Sudhir Rath. | Land Line No.<br>Mobile No. —<br>Email ID | [illegible] |
| 18) | विभागीय उपआयुक्त महिला व बाल विकास पुणे विभाग | सुधीर साळवी<br>[illegible] | Land Line No. 020/61202<br>Mobile No. 9561483464<br>Email ID Salvisudhir8@gmail.com | [illegible] |

STAPI | BCPT

Consultation Meeting for 1% Orphan Reservation / Anath Certificate

Jointly Organized : Sosva Training And Promotion Institute (STAPI) and Sanath Welfare Foundation Pune

With Support Of : Women and Child Development State of Maharashtra

Sponsored By : Bombay Community Public Trust (BCPT) Mumbai

Venue :- Sosva Training And Promotion Institute (STAPI)

Date: 23 January 2019

| Sr. No. | Name & Address of NGOs/Govt. Organization | Name & Designation of NGOs/Govt. Institution | Contact Details of NGOs/Govt. Institution | Signature |
|---|---|---|---|---|
| 19) | शासकिय मुलांचे (वरिष्ठ) अनुरक्षणगृह | HAKE Nagnath student | Land Line No.<br>Mobile No. 7587996430<br>Email ID hakenagnath21@gmail.com | |
| 20) | शासकीय मुलांचे अनुरक्षणगृह येरवडा. | चंद्रकांत गोविंदराव गोगावे (विद्यार्थी) | Land Line No.<br>Mobile No. 7218264607<br>Email ID | |
| 21) | Govt. Senior Boys after care Home, yerawada | Babarao Maruti rao Gaddamwad (student) | Land Line No.<br>Mobile No. 7798001769<br>Email ID babaraogaddamwad@gmail.com | |



STAPI | BCPT

Consultation Meeting for 1% Orphan Reservation / Anath Certificate

Jointly Organized : Sosva Training And Promotion Institute (STAPI) and Sanath Welfare Foundation Pune

With Support Of : Women and Child Development State of Maharashtra

Sponsored By : Bombay Community Public Trust (BCPT) Mumbai

Venue :- Sosva Training And Promotion Institute (STAPI)

Date: 23 January 2019

| Sr. No. | Name & Address of NGOs/Govt. Organization | Name & Designation of NGOs/Govt. Institution | Contact Details of NGOs/Govt. Institution | Signature |
|---|---|---|---|---|
| 22) | " | V. B. Shete, member C.W.C. Kolhapur. | Land Line No.<br>Mobile No. 7385917955<br>Email ID shetevb52@gmail.com | |
| 23) | | Ritesh Bharadiya Aurangabad. | Land Line No.<br>Mobile No. 9890986677<br>Email ID bharadiyaritesh@gmail.com | |
| 24) | | Pooja Ritesh Bharadiya Aurangabad | Land Line No.<br>Mobile No. 8766707815<br>Email ID bharadijapooja94@gmail.com | PoojaBharadiya |

(9)

STAPI

**Consultation Meeting for 1% Orphan Reservation / Anath Certificate**

**Jointly Organized : Sosva Training And Promotion Institute (STAPI) and Sanath Welfare Foundation Pune**

**With Support Of : Women and Child Development State of Maharashtra**

**Sponsored By : Bombay Community Public Trust (BCPT) Mumbai**

**Venue :- Sosva Training And Promotion Institute (STAPI)** **Date: 23 January 2019**

| Sr. No. | Name & Address of NGOs/Govt. Organization | Name & Designation of NGOs/Govt. Institution | Contact Details of NGOs/Govt. Institution | Signature |
|---|---|---|---|---|
| 25 | | Ravindra Jadhav. Pune. raviindraasadhujadhav@gmail.com | Land Line No.<br>Mobile No. 7387113962<br>Email ID | [signature] |
| 26 | | Jayesh R. Dighe Pune. | Land Line No.<br>Mobile No. 9881216364<br>Email ID | [signature] |
| 27 | | Vinod chavan pune | Land Line No.<br>Mobile No. 7761842545<br>Email ID | [signature] |

(10)

STAPI

**Consultation Meeting for 1% Orphan Reservation / Anath Certificate**

**Jointly Organized : Sosva Training And Promotion Institute (STAPI) and Sanath Welfare Foundation Pune**

**With Support Of : Women and Child Development State of Maharashtra**

**Sponsored By : Bombay Community Public Trust (BCPT) Mumbai**

**Venue :- Sosva Training And Promotion Institute (STAPI)** **Date: 23 January 2019**

| Sr. No. | Name & Address of NGOs/Govt. Organization | Name & Designation of NGOs/Govt. Institution | Contact Details of NGOs/Govt. Institution | Signature |
|---|---|---|---|---|
| 28 | Mr. Dhaware B.G. MDF Pune | MDF Pune | Land Line No.<br>Mobile No. 9765863661<br>Email ID | [signature] |
| 29 | A.D. Dangat | Member CWC-2 Pune | Land Line No.<br>Mobile No. 8452044526<br>Email ID aldangat5@gmail. | [signature] |
| 30 | Dr. L.N. Danawade | Member CWC 2, Pune cwc2018pune2@gmail.com | Land Line No. —<br>Mobile No. 9673272733<br>Email ID Indunawade@gmail.com | [signature] |

(11)

STAPI

Consultation Meeting for 1% Orphan Reservation / Anath Certificate
Jointly Organized : Sosva Training And Promotion Institute (STAPI) and Sanath Welfare Foundation Pune
With Support Of : Women and Child Development State of Maharashtra
Sponsored By : Bombay Community Public Trust (BCPT) Mumbai

Venue :- Sosva Training And Promotion Institute (STAPI) Date: 23 January 2019

| Sr. No. | Name & Address of NGOs/Govt. Organization | Name & Designation of NGOs/Govt. Institution | Contact Details of NGOs/Govt. Institution | Signature |
|---|---|---|---|---|
| 31 | Adv. Shashikant Sawarkar | Members CWC No 2 Pune | Land Line No.<br>Mobile No. 9822910828<br>Email ID sawarkarshashi@gmail.com. | [signature] |
| 32 | Mayur Bagul Program officer | Catalysts for social action, Pune | Land Line No.<br>Mobile No. 9095210659<br>Email ID mayur.bagul@csa.org.in | [signature] |
| 33 | Lucy Mathew program manager | ——— " ——— | Land Line No.<br>Mobile No.<br>Email ID Lucy.mathew@csa.org.in | for [signature] |

(12)

STAPI

Consultation Meeting for 1% Orphan Reservation/Anath Certificate
Jointly Organized : Sosva Training And Promotion Institute (STAPI) and Sanath Welfare Foundation Pune
With Support Of : Women and Child Development State of Maharashtra
Sponsored By : Bombay Community Public Trust (BCPT) Mumbai

Venue :- Sosva Training And Promotion Institute (STAPI) Date: 23 January 2019

| Sr. No. | Name of Govt. Officials and Designation | Detail Address of Office Department | Contact Details | Signature |
|---|---|---|---|---|
| | Ravi Patil Dy. com. (CW) WCD, pune. | 26, queens garden Near VVIP circuit house, pune | Land Line No.<br>Mobile No. 9423042648<br>Email ID ravipatil458@gmail.com | [signature] |
| | | | Land Line No.<br>Mobile No.<br>Email ID | |
| | | | Land Line No.<br>Mobile No.<br>Email ID | |

**महिला व बाल विकास विभाग महाराष्ट्र विभाग शासनद्वारा अनाथ मुलांना खुल्या प्रवर्गातून शिक्षण व नोकरी ह्यामध्ये १%समांतर आरक्षण निर्णय वर्षपूर्ती निमित्त परिसंवाद.**



दि.२३/०१/२०१९ रोजीस्टापी येथे प्रकल्प ''माया'' अंतर्गत महिला व बाल विकास विभाग महाराष्ट्र विभाग शासनद्वारा अनाथ मुलांना खुल्या प्रवर्गातून शिक्षण व नोकरी ह्यामध्ये १%समांतर आरक्षण निर्णय वर्षपूर्ती निमित्त परिसंवाद श्री. प्रभाकर दि. करंदीकर भा.प्र.से. (निवृत्त) अध्यक्ष, सोस्वा ट्रेनिंग ॲण्ड प्रमोशन इन्स्टिट्यूट (स्टापी) श्री.रवी पाटील उपायुक्त महिला व बाल विकास विभाग महाराष्ट्र राज्य



दि.२३/०१/२०१९ रोजी सोस्वा येथे श्री. गायत्री पाठक सनाथ वेलफेअर फाउडेशन अनाथ प्रमाणपत्र आणि १% समांतर आरक्षण अनुषंगाने प्रकल्प माया विषयी सविस्तर माहिती देत असताना.




दि.२३/०१/२०१९ रोजी स्टापी येथे श्री. विष्णु शेटे सर ह्यांनी काम करण्याचा आपला अनुभव सविस्तर माहिती देत असताना.



दि.२३/०१/२०१९ रोजी स्टापी येथे श्री. डॉ. सुनिल कुमार लवटे ह्यांनी अनाथ, निराधारव निराश्रित मुलांबरोबर काम करण्याचा आपला अनुभव सविस्तर माहिती देत असताना.



दि.२३/०१/२०१८ रोजी स्टापी येथे उपस्थित स्वयंसेवी संस्था प्रतिनिधी आणि शासन प्रतिनिधी ह्याचा समुह फोटो.



दि.२३/०१/२०१८ रोजी स्टापी येथे उपस्थित स्वयंसेवी संस्था प्रतिनिधी आणि शासन प्रतिनिधी ह्याचा समुह फोटो.



दि.२३/०१/२०१८ रोजी स्टापी येथे श्री सुभाषचंद्र वाघोळीकर सल्लागार समिती स्टापी पुणे  अनाथ प्रमाणपत्र आणि १% समांतर आरक्षण हे सुलभ पध्दतीने मिळावी हे व्यक्त केले.




दि.२३/०१/२०१८ रोजी स्टापी येथेश्रीमती.परिणीता कानिटकर, मुख्य कार्यकारी अधिकारी, स्टापी पुणे ह्यांनी उपस्थित विषय तज्ञ पॅनल सदस्य आणि उपस्थित स्वयंसेवी संस्थांना आभार व्यक्त केले.




दि.२३/०१/२०१८ रोजी स्टापी येथे उपस्थित स्वयंसेवी संस्था प्रतिनिधी आणि शासन प्रतिनिधी ह्याचा समुह फोटो.



दि.२३/०१/२०१९ रोजीस्टापी येथे प्रकल्प ''माया'' अंतर्गत महिला व बाल विकास विभाग महाराष्ट्र विभाग शासनद्वारा अनाथ मुलांना खुल्या प्रवर्गातून शिक्षण व नोकरी ह्यामध्ये १%समांतर आरक्षण निर्णय वर्षपूर्ती निमित्त परिसं रोजी डॉ. सुनिल कुमार लवटे सल्लागार समिती सदस्य प्रकल्प माया व माजी अध्यक्ष महाराष्ट्र राज्य परिविक्षा व अनुरक्षण संघटना,